# प्रेसनोट दि. ०५/०६/२०१७

## चॅन स्नॅचिंग, फसवणुक, घरफोडी चोरी, वाहन चोरी, व इतर चोरी करणारे आंतरराज्य टोळीच्या सराईत गुन्हेगारांना गुन्हे शाखा, युनिट-५ पुणे शहर यांनी केले जेरबंद.

---

गुन्हे शाखा युनिट-५ पुणेचे हददीत सोन साखळी चोरीचे तसेच वाहन चोरीचे गुन्हे वाढल्याने मा.वरिष्ठांचे आदेशाने गुन्हे शाखा युनिट-५ हददीत विविध ठिकाणी सापळे लावण्यात आले होते. इकडील पोलीस स्टाफ पेट्रोलींग करीत असताना सपोनिरी. महादेव वाघमोडे, पो.हवा.माणिक पवार, पोलीस नाईक अमजद पठाण, प्रमोद घाडगे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, चैन चोरी करणारा रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे- जफर इराणी रा. लोणी काळभोर पुणे हा त्याचे साथीदारांसह मंतरवाडी-ऊंड्री मार्गे कोंढवा येथे त्याचे कडील काळे रंगाची होंडा युनिकॉर्न मो.सा. वरुन येणार आहेत अशी खात्रिशिर बातमी मिळाली.

सदरच्या माहिती प्रमाणे मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली युनिट-५ कडील पोलीस स्टाफ यांनी बातमीप्रमाणे विविध ठिकणी सापळे लावले असता त्यातील एक सापळा ऊंड्री चौकजवळ, पुणे येथे लावला, सदर ठिकाणी एका संशयीत मोटारसायकलवर दोन हेल्मेटधारी इसम येताना दिसल्याने त्यांना थांबण्याचा इशारा केला असता ते पळुन जाऊ लागल्याने त्यांचा युनिट ५ कडील स्टाफच्या मदतीने पाठलाग करुन त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे विचारपुस करता त्यांनी त्यांची नावे १) जफर शाहजमान इराणी वय-३८ वर्षे रा.पठारे वस्ती, लोणी काळभोर ता. हवेली जि.पुणे सध्या रा.शिंदे मळा, कंजारी वस्ती, वाखरी ता.दौंड जि.पुणे २) अमजद रमजान पठाण वय-३५ वर्षे सध्या रा. टाटा मोबाईल टॉवरजवळ, टि.पी.एस.रोड, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, जि.बीड मुळ रा. कसबा खटोली तहसिल-जानसट जि. मुझफ्फरनगर, उत्तरप्रदेश अशी सांगितली व त्यांच्या ताब्यातील होंडा युनिकॉर्न मो.सा.नं. MH04-AN-2893 या मोटार सायकलबाबत विचारपुस केली असता ते उडवाउडवीची उत्तरे देऊ लागल्याने आमचा संशय बळावल्याने त्यांना ताब्यात घेतले.

त्यांच्याकडे कसुन चौकशी केली असता प्रथम त्यांनी कोंढवा पोलीस स्टेशन हद्दीतील अतुरनगर भागात एका महिलेच्या गळयातील चैन स्नॅचिंग केल्याची कबुली दिल्याने त्यांना दाखल गुन्हयामध्ये दि.०१/०६/२०१७ रोजी अटक करण्यात आले. अटक मुदतीत त्यांच्याकडे तपास केला असता त्यांच्या अंगझडती मध्ये एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल व दोन हेल्मेट, रोख ४,०००/- रु. मिळुन आले. वरील सॅमसंग मोबाईल बाबत तपास केला असता तो चोरीचा असुन त्याबाबत वानवडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल आहे. दि.०२/०६/२०१७ रोजी मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, लष्कर न्यायालय, पुणे यांचे समोर हजर केले असता त्यांना दि.०५/०६/२०१७ रोजी पर्यन्त पोलीस कस्टडी रिमांड देण्यात आली होती

पोलीस कस्टडी रिमांड दरम्यान वर नमुद आरोपींकडे सखोल तपास केला असता व त्याचे वास्तव्याचे व राहण्याचे ठिकाणी घर झडत्या घेतल्या व आरोपीने तपासात दिलेल्या माहितीवरुन खालील प्रमाणे त्यांनी व त्यांच्या साथिदारांनी पुणे शहर, जिल्हा, राज्य व पर राज्यात केलेल्या विविध गुन्हयांची कबुली दिली आहे.

| अ.क्र. | कार्यक्षेत्र | चैन चोरी | फसवणुक | घरफोडी | वाहन चोरी | इतर चोरी | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे शहर | १८ | १८ | ०५ | ०१ | ०९ | ५१ |

नमुद आरोपींनी विविध गुन्हयात चोरी केलेला व काढुन दिलेले जप्त सोन्याचांदीचे दागिने व रोख रक्कम परिकीय चलन व चोरीच्या पैशातुन खरेदी केलेली वाहने व इतर वस्तु याची माहिती खालील प्रमाणे.

| अ.क्र. | विविध जप्त मौल्यवान वस्तु / परकीय चलन | किंमत रुपये |
|---|---|---|
| १. | सोन्याचे दागिने | रु. ५९,७६,०७५/- |
| २. | चांदींचे दागिने | रु. ४,१९०/- |
| ३. | रोख रक्कम | रु. ६६,०४,०००/- |
| ४. | परिकीय चलन (पौंड,डॉलर) | रु. ३,०८,४८२/- |
| | एकुण | रु. १,२८,९२,७४७/- |

वर नमुद आरोपीकडुन जप्त करण्यात आलेली वाहने नमुद प्रमाणे.

१. स्विफ्ट कार नंबर एम.एच.१२ एल.डी.१४७२
२. रॉयल इन्फील्ड बुलेट एम.एच.१२ एल.सी. १४७२
३. युनिकॉर्न मो.सा.नं. एम.एच.०४ ए.एन. २८९३ (मुळ नंबर एम.एच.१२ एन.जी.४००२)

वर नमुद आरोपींनी गुन्हे करताना वापर केलेली साधने / हत्यारे / इलेक्ट्रॉनिक वस्तु

१. बायनाक्युलोर लावलेली छऱ्याची बंदूक
२. स्कील कंपनीचे १८०० वॅटचे कटर मशीन
३. एकुण ०८ विविध कंपनीचे मोबाईल हॅन्डसेट व विविध कंपनीचे सिमकार्ड
४. एकुण ०४ हेल्मेट / स्पिड बाईकवरील जर्किन
५. एक मल्टी युज हॅन्डकटर

वर नमुद आरोपींचा पुर्व इतिहास व गुन्हे

१. जफर शाहजमान इराणी वय-३८ वर्षे रा.पठारे वस्ती, लोणी काळभोर ता. हवेली जि.पुणे सध्या रा.शिंदे मळा, कंजारी वस्ती, वाखरी ता.दौंड जि.पुणे

एकुण १२ गुन्हे त्यामध्ये चैन स्नॅचिंग,फसवणुक व वाहन चोरी

२. अमजद रमजान पठाण वय-३५ वर्षे सध्या रा. टाटा मोबाईल टॉवरजवळ, टि.पी.एस.रोड, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, जि.बीड मुळ रा. कसबा खटोली तहसिल-जानसट जि. मुझफ्फरनगर, उत्तरप्रदेश

एकुण ०५ गुन्हे त्यामध्ये चैन स्नॅचिंग, फसवणुक व वाहन चोरी

जफर शाहजमान इराणी वय-३८ वर्षे रा.पठारे वस्ती, लोणी काळभोर ता. हवेली जि.पुणे सध्या रा.शिंदे मळा, कंजारी वस्ती, वाखरी ता.दौंड जि.पुणे हा पंढरपुर पोलीस स्टेशन, कोंढवा पोलीस स्टेशन व लोणी काळभोर पोलीस स्टेशन येथील दाखल गुन्हयात फरारी आहे.

वर नमुद आरोपींच्या ताब्यातुन मौल्यवान वस्तु/परकीय चलन, रोख रक्कम व इतर मालमत्ता असा एकुण किं. रु. ०१,४०,६९,४६४/- चा मुद्देमाल जप्त करणेत आलेला आहे. आत्तापर्यंत एकुण ५१ गुन्हे उघडकीस आलेले आहेत व अजून २५ ते ३० गुन्हे उघडकीस येतील.

सदरची कामगिरी ही श्री. प्रदीप देशपांडे सो. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा, श्री. सुरेश भोसले, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री. संजय निकम, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-२ यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा,युनिट-५, पुणे कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय चव्हाण, स.पो.निरी. महादेव वाघमोडे, पो.उप-निरीक्षक अकिल शेख, पोलीस हवालदार माणिक पवार, लक्ष्मण शिंदे, शिवाजी घुले, मनोज साळुंखे, प्रदिप सुर्वे, अजय खराडे, प्रविण शिंदे, पोलीस नाईक अमजद पठाण, भरत रणसिंग, महेश वाघमारे, प्रविण काळभोर, सचिन घोलप, प्रमोद घाडगे, गणेश बाजारे, अंकुश जोगदंडे,सुहास गायकवाड, संजयकुमार दळवी यांनी केली आहे.





